# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२३/१०/२०१८
## दि.२२/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ११९८/१८,भादविक १४३,१४७,१४८,१४९,३०७,१२०ब,५०७,सह आर्म ॲक्ट कलम ३(२५) मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे |
| **फिर्यादी** | विशाल ढोरे,वय-३५ वर्षे,रा.मांजरी-ब्रुद्रुक,पुणे |
| **आरोपी** | एकुण चार इसम व एक अज्ञात मोबाईलधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/१०/२०१८ रोजी १९/०० वा.ते दि.२१/१०/२०१८ रोजी १७/०० वा.चे दरम्यान पुर्वा हॉस्पीटीलीटी सर्व्हिस ॲण्ड प्रॉपर्टीज,पुणे-सोलापुर हायवेलगत असलेल्या मांजरी स्टड फॉर्म मांजरी-ब्रुद्रुक,पुणे या परिसरात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र शरद देवकाते यांचेशी सोलापुर हायवेलगत असलेल्या मांजरी स्टड फार्मचे शेजारी पुर्वा हॉस्पीलिटी सर्व्हिस ॲण्ड प्रॉपर्टीज,मांजरी-ब्रुद्रुक,पुणे याठिकाणी बोलत उभे असताना,यातील नमुद इसमांनी पुर्वी झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीतील भांडणाचा राग मनात धरुन,आप-आपसात कट रचुन,फिर्यादीस जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांचेवर बंदुकीच्या गोळीने फायर केला. तसेच फिर्यादीस वेळोवेळी फोन द्वारे धमकाविले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. चव्हाण ७०३८१९९३०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ३००/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | तृप्ती अब्राहम,वय-३९ वर्षे,रा.धनकवडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/१०/२०१८ रोजी सकाळी ११/०० ते ०२/०० वा. चे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरी स.नं.३५/११/१/२,फ्लॅट नं.१७,चौथा मजला दि रिव्हेरी रेसिडेन्सी सहकारी सोसायटी, धनकवडी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख व सोन्याचे दागिने असा एकुण २,२३,७५०/- रू किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, व्हि.बी.कोळी ९८३४०७६०४७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २१३/१८,भादविक ४५७,३८०,३४ |
| **फिर्यादी** | विजय हाडके,वय-६९ वर्षे,रा.७४६,डेक्कन जिमखाना,पुणे |
| **आरोपी** | तीन अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/१०/२०१८ रोजी पहाटे ०३/५० ते पहाटे ०४/३० वा.चे दरम्यान पांचाळेश्वर मंदिर ७४५,डेक्कन,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पांचाळेश्वर मंदिराचे व्यवस्थापक असुन,कोणीतरी तीन अज्ञात इसमांनी पांचाळेश्वर मंदिराचे लोखंडी दानपेटी मध्ये भाविकांनी दान केलेले चिल्लर व नोटा अशी एकुण १०,०००/- रूपये रक्कम असलेली दान पेटी उचकटुन,सदरची रक्कम ही घरफोडी चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.बी.जोशी ९८५०६६४८४५ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे ३९९/१८,भादविक ४९८(अ),३०६ |
| **फिर्यादी** | लक्ष्मणसिहग जमैदार,वय-४८,रा.उत्तर सोलापुर,जि.सोलापुर |
| **आरोपी** | १.सोनु ऊर्फ हरिष रतनसिंग बाबावाले व इतर दोन,रा.घर नं.९,आनंद मठा जवळ,जनता वसाहत,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/१०/२०१८ रोजी १५/०० वा. घर नं.९,आनंद मठा जवळ,जनता वसाहत,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुलगी सौ.प्रिती सोनु उर्फ हरिष बाबावाले,वय-१९ वर्षे हिचे पती सोनु उर्फ हरिष बाबावाले याचेबरोबर दि.१४/०५/२०१७ रोजी लग्न होवुन ती सासरी नांदत असताना,तीचा पती व सासु-सासरे यांनी सौ.प्रिती हिस स्वयंपाक करता येत नाही,घरातील कामे बरोबर करीत नाही तसेच तीचे चारित्र्यावर संशय घेवुन,तीचे लग्नात घातलेल्या दागिन्या मध्ये बटटा असलेच्या कारणावरुन,तसेच नवीन प्लॉट घेण्यासाठी माहेराहुन पैसे आणण्याचे कारणावरुन,तीचेबरोबर न बोलणे,तीला मारहाण करून,तीस तु कायमची घरातुन निघुन जा असे म्हणुन तीचा वारंवार शारिरीक व मानसिक छळ करून,सौ.प्रिती हिस तीचे राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. हजारे ९६०४५७४०६४ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ११९६/१८,भादविक ३५३,३३२,३२३,५०४,मुंबई दारुबंदी कायदा कलम ८५/१ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११०/११७ प्रमाणे |
| **फिर्यादी** | संतोष राठोड, पोलीस शिपाई, हडपसर पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | प्रमोद वसंत भिंताडे,वय-३८ वर्षे,रा.स.नं.१३,श्रमिक कॉलनी,सातववाडी,हडपसर,पुणे येथे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/१०/२०१८ रोजी २२/०० ते २२/३० वा.चे दरम्यान पुणे-सोलापुर रोडवर हॉटेल वैशाली समोर व त्यानंतर हडपसर पोलीस स्टेशन पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम प्रमोद भिताडे याचे व दुसरे वाहन या दोघांमध्ये किरकोळ अपघात झाल्याने त्यांचेत आपसात वाद-विवाद चालु होते. त्यामुळे सदर ठिकाणी भरपुर गर्दी जमल्याने नियंत्रण कक्षाचे आदेशान्वये हडपसर बीट मार्शलचे कर्तव्यावरील पोलीस कर्मचारी संतोष राठोड व पोलीस शिपाई येदले असे दोघे नमुद ठिकाणी गेले असताना,सदर इसम प्रमोद भिताडे याने पोलीसांना उद्देशुन,तुमचे इथे काय काम आहे असे उदधट बोलुन,पोलीस शिपाई संतोष राठोड यांना धक्का-बुक्की करून,ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला आहे. तसेच त्यास पोलीस ठाणे येथे आणलेनंतर त्याने पोलीसांना अपशब्द वापरले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. गाडे ८८८८८७९९६९ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे २९३/१८,भादविक ४२०,४६८ |
| **फिर्यादी** | अर्जुन देवकर,वय-२३,रा.ता.माण,जि.सातारा |
| **आरोपी** | एक महिला,रा.जि.सातारा (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे नोव्हेंबर २०१७ पासुन ते आजपावेतो ज्ञानेश्वर पादुका चौकातील आयडीबीआय बँकेचया एटीएम मध्ये एफ.सी.रोड,शिवाजीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद महिला हिने फिर्यादी यांना भारत सरकारच्या कर्मचारी राज्य विमा निगम (इएसआयसी) विभागा मध्ये पब्लिक रिलेशन ऑफीसर व क्लार्क पदावर नोकरी लावण्याचे अमिष दाखवुन,फिर्यादी यांचेकडुन १ लाख ५ हजार रूपये घेवुन त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. सागर गरूड |

## दि.२३/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७६४/१८,भादविक ३०७,३४,महा.पो.का.क. ३७(१)१३५,आर्म ॲक्ट ३(२५) |
| **फिर्यादी** | भाऊसाहेब ढोकणे,वय-३८,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/१०/२०१८ रोजी २०/३० वा. संगमवाडी पार्कीगचे समोर येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा भाऊ देवानंद याचेसह त्यांचे कार मधुन राहते घरी येण्यासाठी नमुद ठिकाणी आले असताना,कोणीतरी अनोळखी इसमांनी देवानंद यास जीवे ठार मारण्याचे उद्देशाने अग्नीशस्त्राने दोन ते तीन राऊंड फायर करून,त्यांना जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. विनोद शिंदे |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४२१/१८,भादविक ३५३,३३२,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | विनोद पोतदार, पो.हवा. वानवडी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/१०/२०१८ रोजी २३/१५ वा. महंम्मदवाडी पोलीस चौकी मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे महंम्मदवाडी पोलीस चौकी येथे सैय्यदनगर, चिंतामणीनगर येथे झालेल्या गाडयांच्या तोडफोडीबाबचे साक्षीदारांकडे विचारपुस करुन त्यांचा जबाब नोदविंत असताना, यातील नमुद इसम राजेश कोडींबा बधाले याने चौकीत आरडा-ओरडा करुन,अपशब्द वापरुन त्यांचे अंगावर धावुन येवुन,त्यांना धक्का-बुक्की करून,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.डी.गायकवाड |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४२०/१८,भादविक ४२७,३४ म.पो.अधि.३७(१)(३),१३५ आर्म ॲक्ट ४ (२५) क्रि.लॉ ॲमेडमेंट ३ व ७ |
| **फिर्यादी** | बेगम सैय्यद,वय-४८,रा.सैय्यदनगर,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | एकुण चार इसम,सर्व रा.चिंतामणीनगर हांडेवाडी रोड,हडपसर,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/१०/२०१८ रोजी २०/१५ वा.सैय्यदनगर गल्ली नं.१४,महंम्मदवाडी हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी हातामध्ये लोंखंडी तलवार,लाकडी दांडके असे घेवुन येवुन मोठ-मोठयाने आरडा-ओरडा करून,मतीन किधर है असे ओरडुन त्याचे हातातील हत्याराने रस्त्यावरील गांडयांचे काचा फोडुन मोठया प्रमाणत नुकसान केले. तसेच हातातील हत्यार फिरवत सदर भागात दहशत निर्माण करुन,फिर्यादी यांनी पार्क केलेल्या रिक्षावर तलवार व लाकडी दांडक्याने फटके मारुन रिक्षाचे सुमारे ६,०००/- रुपयांचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. पोतदार |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४१९/१८,भादविक ४२७,५०४,५०६(२),म.पो.अधि.३७(१)(३)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रि.लॉ ॲमेडमेंट ३,७ |
| **फिर्यादी** | समीर शेख,वय-२३,रा.हांडेवाडी रोड,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | चार इसम, सर्व रा.हांडेवाडी रोड हडपसर,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/१०/२०१८ रोजी २०/०० वा.जैन टाउनशिप हांडेवाडी रोड चिंतामणीनगर गल्ली नं.७ वानवडी,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मावस भाऊ हा त्याचे पत्नीस नांदवत नाही या कारणावरुन यातील नमुद इसमांनी फिर्यादी तसेच साक्षीदार आसीफ खान यांचे गाडयांचे कुठल्या तरी हत्यार व काठयांनी नुकसान करुन,जैन टाउनशिप सोसायटीचे पार्कींग मधील इतर मोटार सायकल व चारचाकी वाहने तसेच ॲटो रिक्षा या वाहनांवरती काठयांनी मारुन सदर वाहनांचे नुकसान केले आहे. तसेच सदर भागात मोठ-मोठयाने शिवीगाळ करुन, हातातील हत्यार व लाठया-काठया हवेत फिरवुन,सार्वजनिक शांततेचा भंग करुन त्याठिकाणी दहशत निर्माण केली. तेथुन जाताना चिंतामणीनगर गल्ली नं.७ येथील बाबा वडापाव या हातगाडीचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गायकवाड |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**